सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन

## औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

### सक्षम व्यक्ती प्रमाणपत्र

प्रमाणपत्र क्रमांक :- MS/DISH/CPC/G-051/2023

मी, **श्री. मु. र. पाटील**, प्रभारी संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई, कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम २(ca) आणि त्या अंतर्गत असलेल्या नियमांच्या नुसार दिलेल्या शक्तीचा वापर करुन **श्री. गोठी प्रकाश सी., प्रोप्रायटर, मे. चार्टड टेक्नो सर्व्हिसेस, भारत बाजार, डी विंग, ए ब्लॉक, पहिला माळा, एपीआय कॉर्नर, चिखलठाणा, औरंगाबाद-४३१००६** यांना महाराष्ट्र राज्यातील कारखान्यांत वापरल्या जाणाऱ्या उपकरणांच्या चाचण्या, परीक्षण, तपासणी व प्रमाणित करण्याकरीता खालील कलम व त्या अंतर्गत असलेल्या नियमांनुसार महाराष्ट्र राज्यासाठी **सक्षम व्यक्ती** म्हणून मान्यता देत आहे. या प्रमाणपत्राची **वैधता दिनांक ३१/१२/२०२५** पर्यंत आहे.

- i) Section 28 : Lifts and Hoists.
- ii) Section 29 : Lifting Machines, Chains, Ropes, Lifting Tackles.
- iii) Section 31 : Pressure Vessels and Plants

सदर प्रमाणपत्र खालील नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

१. चाचणी, तपासणी व परीक्षण हे अधिनियम व त्या अंतर्गत असलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार केले पाहिजे.

२. अधिनियम व त्या अंतर्गत असलेल्या नियमांमध्ये नमूद केले नसल्यास, प्रत्येक चाचणी/तपासणी ही संबंधित मानकांनुसार केली पाहिजे.

३. चाचणी/तपासणी केल्यानंतर जर उपकरणांमध्ये दोष आढळले असतील, काही दुरुस्त्या अथवा फेरफार सुचविण्यात आले असतील, तर अशा सर्व प्रकरणांमध्ये चाचणी/तपासणीच्या प्रती संबंधित उप/सहाय्यक संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य यांना ७ दिवसात सादर कराव्यात.

४. चाचणी आणि तपासणीची पूर्वसूचना सक्षम व्यक्तीने संबंधित कार्यालयास देणे आवश्यक आहे.

५. चाचणी आणि तपासणी दरम्यान सक्षम व्यक्तीने प्रत्यक्ष उपस्थित रहावे आणि केलेल्या कामाचा तपशील, केलेली निरीक्षणे, दिलेले निर्देश इत्यादीची नोंद विहीत नमुन्यातील रोज वहीत ठेवावी.

६. वापरण्यात येणारी उपकरणे व सुविधा या सदैव चांगल्या व कार्यक्षम अवस्थेत ठेवावीत आणि वेळोवेळी कॅलिब्रेट करुन घ्यावीत व कॅलिब्रेशन प्रमाणपत्राची प्रत दरवर्षी संचालनालयास सादर करावी.

७. सक्षम व्यक्तीने सशर्त प्रमाणपत्रे जारी करु नयेत तसेच जारी केलेल्या प्रत्येक चाचणी/तपासणी प्रमाणपत्रावर, प्रमाणपत्र क्रमांक आणि वैधता कार्यकाल नमूद करावा.

८. वैधता कार्यकाल संपल्यानंतर चाचण्या/तपासण्या करु नयेत.

९. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सदर सक्षम व्यक्ती प्रमाणपत्र रद्द करण्याचे, विलोपन करण्याचे अथवा दुरुस्त करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.

१०. सक्षम व्यक्ती प्रमाणपत्र नूतनीकरण करण्याकरीता अर्ज, वैधता कालावधी संपण्याआधी कमीत कमी दोन महिने केला पाहिजे.

MUKESH
RAGHUNATH
PATIL

क्र. औसुवआ/ निरीक्षण/सव्यप्र/२०५/ ३६८/६,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,
कामगार भवन, ५ वा मजला, वांद्रे-कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

दिनांक :- 12 JAN 2023

(मु. र. पाटील)
प्रभारी संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.